भारत सरकार

विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# व्यवसाय संघ अधिनियम, १९२६

(१९२६ चा अधिनियम क्रमांक १६)

[१ मार्च १९९५ रोजी यथाविद्यमान]

[महाराष्ट्र विशोधन अधिनियमांसहित]

# The Trade Unions Act, 1926

**(Act No. 16 of 1926)**

**[As in force on the 1st March 1995]**

**[In its application to the State of Maharashtra]**

संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४
यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९८

[ किंमत रु. ३-०० ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ मार्च १९९५ रोजी यथाविद्यमान असलेला दि ट्रेड युनियन्स अ‍ॅक्ट, १९२६ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ६, अंक १ दिनांक २२ जून १९९५ यात पृष्ठ ५५ ते ६४ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशारीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २२ जून १९९५.

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Trade Unions Act, 1926 as on the 1st March, 1995 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India* Extraordinary Part XII, Section 1, No. 1, Vol. 6, dated 22nd June 1995 on pages 55 to 64.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 22nd June, 1995.

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

## विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची सूची

१. ' भारतीय व्यवसाय संघ (विशोधन) अधिनियम, १९२८ ' (१९२८ चा १५).

२. ' भारत शासन (भारतीय कायद्यांचे अनुकूल) आदेश, १९३७.'

३. ' निरसन व विशोधन अधिनियम, १९४२ ' (१९४२ चा २५).

४. ' भारतीय स्वातंत्र्य (केंद्रीय अधिनियम व अध्यादेश यांचे अनुकूलन) आदेश, १९४८.'

५. ' विधी अनुकूलन आदेश, १९५० '.

६. ' भाग ख राज्ये (कायदे) अधिनियम, १९५१ ' (१९५१ चा ३).

७. ' भारतीय व्यवसाय संघ (विशोधन) अधिनियम, १९६० ' (१९६० चा ४२).

८. ' भारतीय व्यवसाय संघ (विशोधन) अधिनियम, १९६४ ' (१९६४ चा ३८).

९. ' केंद्रीय कामगार कायदे (जम्मू व काश्मीर विस्तारण) अधिनियम, १९७० ' (१९७० चा ५१).

# व्यवसाय संघ अधिनियम, १९२६

कलमांचा क्रम

## प्रकरण १ ले

### प्रारंभिक

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. व्याख्या.

## प्रकरण २ रे

### व्यवसायसंघांची नोंदणी

३. निबंधकांची नियुक्ती.
४. नोंदणी करण्याची पद्धती.
५. नोंदणीसाठी अर्ज.
६. व्यवसायसंघाच्या नियमावलीत अंतर्भूत असावयाचे उपबंध.
७. आणखी तपशील मागवण्याची व नावांमध्ये फेरबदल करावयास सांगण्याची शक्ती.
८. नोंदणी.
९. नोंदणी प्रमाणपत्र.
१०. नोंदणी रद्द करणे.
११. अपील.
१२. नोंदलेले कार्यालय.
१३. नोंदलेल्या व्यवसाय संघाचे निगमन.
१४. विवक्षित अधिनियम नोंदलेल्या व्यवसाय संघांना लागू व्हावयाचे नाहीत.

## प्रकरण ३ रे

### नोंदलेल्या व्यवसायसंघांचे अधिकार व दायित्वे

१५. ज्या उद्दिष्टांवर सर्वसाधारण निधी खर्च करता येईल ती उद्दिष्टे.
१६. राजकीय प्रयोजनार्थ एक स्वतंत्र निधी घटीत करणे.
१७. व्यावसायिक तंटयांमध्ये फौजदारीपात्र कट.
१८. विवक्षित प्रकरणी दिवाणी दाव्यांपासून उन्मुक्ती.
१९. करारांची बजावणी योग्यता.
२०. व्यवसाय संघांच्या हिशेब पुस्तकांचे निरीक्षण करण्याचा अधिकार.
२१. अज्ञान व्यक्तींना व्यवसायसंघाच्या सदस्यत्वाबाबतचे अधिकार.
२१क. व्यवसायसंघाच्या पदाधिकाऱ्यांच्या निरर्हता.
२२. उद्योगाशी संबंधित असावयाच्या अधिकाऱ्यांचे प्रमाण.
२३. नावातील बदल.
२४. व्यवसायसंघांचे संमीलन.
२५. नाव बदलण्याची किंवा संमीलनाची नोटीस.
२६. नावातील बदल व संमीलन यांचे परिणाम.
२७. विसर्जन.
२८. प्रतिवेदने.

## प्रकरण ४ थे

### विनियम

२९. विनियम करण्याची शक्ती.
३०. विनियमांचे प्रकाशन.

## प्रकरण ५ वे

### शास्ती व प्रक्रिया

३१. प्रतिवेदने सादर करण्यात कसूर.
३२. व्यवसायसंघासंबंधी खोटी माहीती पुरविणे.
३३. अपराधांची दखल घेणे.
महाराष्ट्र विशोधन अधिनियम.

# व्यवसायसंघ अधिनियम, १९२६

## [1](१९२६ चा अधिनियम क्रमांक १६)

(दिनांक १ मार्च, १९९५ रोजी यथाविद्यमान ) [२५ मार्च, १९२६]

व्यवसायसंघांची नोंदणी करण्याबाबत उपबंध करण्यासाठी आणि विवक्षित बाबतीत, [2]* * * नोंदणी झालेल्या व्यवसायसंघांसंबंधीचा कायदा निश्चित करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, व्यवसायसंघांची नोंदणी करण्याबाबत उपबंध करणे आणि विवक्षित बाबतीत, [2]* * * नोंदणी झालेल्या व्यवसायसंघांसंबंधीचा कायदा निश्चित करणे समयोचित आहे;

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

### प्रकरण १ ले

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास '[3]* * * व्यवसायसंघ अधिनियम, १९२६' असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

[4][ (२) त्याचा विस्तार [5]* * * संपूर्ण भारतभर आहे.]

(३) केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनद्वारे नियत करील अशा [6]दिनांकास तो अंमलात येईल.

२. या अधिनियमात [7][ "समुचित शासन" याला, ज्या व्यवसायसंघाची उद्दिष्टे एकाच राज्या-पुरती मर्यादित नसतील त्यांच्या संबंधात, केंद्र शासन असा अर्थ आहे, आणि अन्य व्यवसायसंघांच्या संबंधात, राज्य शासन असा अर्थ आहे, आणि ], विषय किंवा संदर्भ यामध्ये काहीही प्रतिकूल नसेल तर,— **व्याख्या.**

(क) "कार्यकारिणी" याचा अर्थ, व्यवसायसंघाच्या कारभाराचे व्यवस्थापन ज्याच्याकडे सोपवलेले आहे तो निकाय असा आहे,— मग तो कोणत्याही नावाने संबोधलेला असो ;

(ख) व्यवसायसंघाच्या बाबतीत, "[8][पदाधिकारी]" यामध्ये त्याच्या कार्यकारिणीच्या कोणत्याही सदस्याचा समावेश होतो, मात्र त्यामध्ये लेखापरीक्षकाचा समावेश होत नाही ;

(ग) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या विनियमांद्वारे, विहित केलेले असा आहे ;

(घ) "नोंदलेले कार्यालय" याचा अर्थ, व्यवसायसंघाचे जे कार्यालय त्याचे मुख्य कार्यालय म्हणून या अधिनियमाखाली नोंदलेले असेल ते कार्यालय असा आहे ;

(ङ) "नोंदलेला व्यवसायसंघ" याचा अर्थ, या अधिनियमाखाली नोंदलेला व्यवसायसंघ असा आहे ;

[9][ (च) "निबंधक" याचा—

(एक) कलम ३ खाली समुचित शासनाने नियुक्त केलेला व्यवसायसंघ निबंधक असा अर्थ आहे, आणि त्यामध्ये कोणत्याही अतिरिक्त किंवा उप व्यवसायसंघ निबंधकाचा समावेश होतो ; आणि

(दोन) कोणत्याही व्यवसायसंघाच्या संबंधातील अर्थ, व्यवसायसंघाचे मुख्य किंवा, प्रकरणपरत्वे, नोंदलेले कार्यालय ज्या राज्यामध्ये असेल त्यासाठी नियुक्त केलेला निबंधक असा आहे ; ]

(छ) "व्यावसायिक विवाद/तंटा" याचा अर्थ, कोणत्याही व्यक्तीचा रोजगार किंवा बेकारी किंवा तिच्या रोजगाराच्या अटी किंवा मजुरीसंबंधीची परिस्थिती यांच्याशी संबंधित असेल असा, नियोक्ते व कामगार यांच्यामधील किंवा कामगारा-कामगारांमधील किंवा नियोक्त्या-नियोक्त्यांमधील कोणताही तंटा असा आहे, आणि "कामगार" याचा अर्थ, तो व्यवसाय किंवा उद्योग यामध्ये कामाला लावलेल्या सर्व व्यक्ती असा आहे—मग ज्या नियोक्त्याशी तंटा उद्भवे त्याच्या कडे त्या कामाला असोत वा नसोत ; आणि

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १९२५, भाग पाच, पृष्ठ ८ आणि प्रवर समितीच्या अहवालासाठी पहा, कित्ता, पृष्ठ १९७.

२. १९६० चा अधिनियम ४२, कलम २ द्वारे "भारताच्या प्रांतांमधील" हे शब्द गाळले.

३. १९६४ चा अधिनियम ३८, कलम ३ द्वारे "भारतीय" हा शब्द गाळला.

४. 'विधि अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे पूर्वीच्या पोटकलम (२) ऐवजी घातले.

५. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूची यांद्वारे "भाग ख राज्य खेरीजकरून" याऐवजी घातलेले "जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून" हे शब्द १९७० चा अधिनियम ५१, कलम २ व अनुसूची यांद्वारे गाळले.

६. १ जून १९२७, पहा गॅझेट ऑफ इंडिया, १९२७, भाग एक, पृष्ठ ४६७.

७. 'भारत शासन (भारतीय कायद्यांचे अनुकूलन) आदेश, १९३७' द्वारे घातले.

८. १९६४ चा अधिनियम ३८, कलम २ द्वारे "अधिकारी" या ऐवजी शब्दोल्लेख घातला.

९. १९६० चा अधिनियम ४२, कलम ३ द्वारे मूळ खंड (च) ऐवजी घातला.

(ज्) "व्यवसायसंघ" याचा अर्थ, कामगार व नियोक्ते यांच्यामधील किंवा कामगार-कामगारांमधील किंवा नियोक्त्या-नियोक्त्यांमधील संबंधांचे नियमन करण्याच्या प्रयोजनार्थ अथवा कोणताही व्यवसाय किंवा धंदा चालवण्यावर निर्बंधक शर्ती लादण्यासाठी मुख्यत्वेकरून केलेली कोणतीही स्थायी किंवा अस्थायी जूट असा आहे, आणि त्यामध्ये दोन किंवा अधिक व्यवसायसंघां-च्या कोणत्याही महासंघाचा समावेश होतो :

परंतु, या अधिनियमामुळे,—

(एक) भागीदारांमधील त्यांच्या स्वतःच्या धंद्याबाबतचा कोणताही करार ;

(दोन) नियोक्ता व त्याने कामाला लावलेल्या व्यक्ती यांच्यामधील अशा रोजगारा-बाबतचा कोणताही करार ; किंवा

(तीन) एखाद्या धंद्याच्या ख्यातिस्वाची विक्री करण्याच्या अथवा कोणताही पेशा, व्यवसाय किंवा हस्तकला यांसधील शिक्षण देण्याच्या प्रतिफलार्थ केलेला कोणताही करार

यांच्याबर परिणाम होणार नाही.

## प्रकरण २ रे

### व्यवसायसंघांची नोंदणी

निबंधकांची नियुक्ती.

३. [1][ (१) ] [2][समुचित शासन] [3][प्रत्येक राज्यासाठी] 'व्यवसायसंघ निबंधक' म्हणून एकेका व्यक्तीची नियुक्ती करील.

[4][ (२) या अधिनियमाखाली निबंधकाच्या ज्या शक्ती व जी कार्ये आहेत त्यांपैकी समुचित शासन आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे निबंधकाच्या अधीक्षणाखाली व निदेशनाखाली त्या त्या शक्ती वापरण्याच्या व ती ती कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, त्या शासनाला स्वतःला योग्य वाटतील तितके अतिरिक्त व उप व्यवसायसंघ निबंधक नियुक्त करता येतील आणि अशा कोणत्याही अतिरिक्त किंवा उप निबंधकाला कोणत्या स्थानिक सीमांमध्ये अशा विनिर्दिष्ट शक्ती वापराव्या लागतील व अशी कार्ये पार पाडावी लागतील ते निश्चित करता येईल.

(३) पोटकलम (२) खालील कोणत्याही आदेशाच्या उपबंधांच्या अधीनतेने, ज्या क्षेत्रामध्ये व्यव-सायसंघाचे नोंदलेले कार्यालय असेल तेथे एखादा अतिरिक्त किंवा उप निबंधक निबंधकाच्या शक्ती वापरील व कार्ये पार पाडील तेव्हा, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ तो अतिरिक्त किंवा उप निबंधक हा त्या व्यवसायसंघांच्या संबंधात निबंधक असल्याचे मानण्यात येईल. ]

नोंदणी करण्याची पद्धती.

४. [5][ (१) ] व्यवसायसंघाच्या कोणत्याही सात किंवा अधिक सदस्यांना, व्यवसायसंघाच्या नियमावलीवर आपल्या नावांच्या स्वाक्षऱ्या करून किंवा या अधिनियमाच्या नोंदणीबाबतच्या उपबंधांचे अन्यथा पालन करून या अधिनियमाखाली व्यवसायसंघाची नोंदणी करण्यासाठी अर्ज करता येईल.

[6][ (२) व्यवसायसंघाच्या नोंदणीसाठी पोटकलम (१) खाली अर्ज करण्यात आला असेल त्याबाबतीत, ज्या व्यक्तींनी अर्ज केला त्यांच्यापैकी काही, पण अर्जदार-संख्येच्या निम्म्यापेक्षा अधिक नाहीत इतक्या अर्जदार-व्यक्तींचे त्या व्यवसायसंघाचे सदस्यत्व अर्जाच्या दिनांकानंतर पण व्यवसायसंघाच्या नोंदणीपूर्वी कोणत्याही वेळी संपुष्टात आले आहे अथवा अर्जाशी आपला संबंध तोडण्याबाबत त्यांनी निबंधकाला लेखी नोटीस दिलेली आहे एवढ्याच कारणाखातर असा अर्ज विधिबाह्य झाला असल्याचे मानण्यात येणार नाही.]

नोंदणीसाठी अर्ज.

५. (१) व्यवसायसंघाची नोंदणी करण्याबद्दलचा प्रत्येक अर्ज निबंधकाकडे करावा लागेल आणि त्यासोबत व्यवसायसंघाच्या नियमावलीची एक प्रत व पुढील तपशील असलेले एक विवरणपत्र जोडावे लागेल, तो तपशील असा :—

(क्) अर्ज करणाऱ्या सदस्यांची नावे, व्यवसाय व पत्ते ;

(ख्) व्यवसायसंघाचे नाव आणि त्याच्या मुख्य कार्यालयाचा पत्ता ; आणि

(ग्) व्यवसायसंघाच्या [7][पदाधिकाऱ्यांचे] किताब, नावे, वय, पत्ते आणि व्यवसाय.

---

१. १९६० चा अधिनियम ४२, कलम ४ द्वारे कलम ३ ला त्याचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक दिला.

२. 'भारत शासन (भारतीय कायद्यांचे अनुकूलन) आदेश, १९३७' द्वारे "प्रत्येक स्थानिक शासन" याऐवजी घातले.

३. वरील आदेशाद्वारे "प्रांतासाठी" याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

४. १९६० चा अधिनियम ४२, कलम ४ द्वारे घातले.

५. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे कलम ४ ला त्याचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक दिला.

६. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे घातले.

७. १९६४ चा अधिनियम ३८, कलम २ द्वारे 'अधिकारी' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला (१ एप्रिल १९६५ रोजी व तेव्हापासून).

(२) एखादा व्यवसायसंघ त्याच्या नोंदणीसाठी अर्ज केला जाण्यापूर्वी एक वर्षाहून अधिक काळ अस्तित्वात असेल त्या बाबतीत, त्या अर्जासोबत विहित करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये तयार केलेले व तशा विहित तपशील अंतर्भूत असलेले असे, व्यवसायसंघाची मत्ता व दायित्वे यांबाबतचे एक सर्वसाधारण विवरणपत्र निबंधकाकडे सादर करावे लागेल.

व्यवसायसंघाच्या नियमावलीत अंतर्भूत असावयाचे उपबंध.

६. एखाद्या व्यवसायसंघाची कार्यकारिणी या अधिनियमाच्या उपबंधानुसार घटित केलेली नसेल आणि तिच्या नियमावलीमध्ये पुढील बाबींसाठी उपबंध नसतील तर, तो व्यवसायसंघ या अधिनियमाखाली नोंदणी होण्यास हक्कदार असणार नाही, त्या बाबी अशा :—

(क) व्यवसायसंघाचे नाव;

(ख) ज्या उद्दिष्टांसाठी व्यवसायसंघ स्थापन केला गेला ती समग्र उद्दिष्टे;

(ग) ज्यांसाठी व्यवसायसंघाच्या सर्वसाधारण निधीचा विनियोग करता येईल ती समग्र प्रयोजने—त्यांपैकी सर्व प्रयोजने ही अशा निधीचा या अधिनियमाखाली ज्यांच्यासाठी विधितः विनियोग करता येईल अशी असावी लागतील ;

(घ) व्यवसायसंघाच्या सदस्यांची सूची ठेवणे आणि व्यवसायसंघाच्या [1][पदाधिकाऱ्यांना] व सदस्यांना तिचे निरीक्षण करण्यासाठी पर्याप्त सुविधा उपलब्ध करून देणे ;

(ङ) सामान्य सदस्य म्हणून प्रवेश देणे—ज्या उद्योगाशी तो व्यवसायसंघ संबंधित आहे त्यामध्ये प्रत्यक्षपणे नेमलेल्या किंवा कामाला असलेल्या अशा त्या व्यक्ती असतील—तसेच व्यवसायसंघाची कार्यकारिणी तयार करण्यासाठी कलम २२ खाली [1][पदाधिकारी] म्हणून जितके मानसेवी किंवा अस्थायी सदस्य आवश्यक असतील त्यांना प्रवेश देणे;

[2][(ङङ) व्यवसायसंघाच्या सदस्यांनी वर्गणी देणे—ती वर्गणी प्रत्येक सदस्यामागे दरमहा पंचवीस नये पैसे यापेक्षा कमी असणार नाही;]

(च) कोणत्याही परिस्थितीत या नियमांद्वारे हमी दिलेल्या कोणत्याही लाभास कोणताही सदस्य हक्कदार होईल आणि सदस्यांवर कोणताही द्रव्यदंड लादता येईल किंवा त्यांच्याकडून काही तरी जप्त करता येईल;

(छ) कोणत्याही रीतीने ते नियम विशोधित करण्यात येतील, त्यांत फेरबदल करण्यात येईल किंवा ते विखंडीत करण्यात येतील;

(ज) व्यवसायसंघाच्या कार्यकारिणीचे सदस्य किंवा अन्य [1][पदाधिकारी] कोणत्या रीतीने नियुक्त करण्यात येतील किंवा पदावरून दूर करण्यात येतील;

(झ) व्यवसायसंघाच्या सर्वसाधारण निधीचा सुरक्षित सांभाळ, त्याच्या हिशेबांची विहित करण्यात येईल अशा रीतीने वार्षिक लेखापरीक्षा, आणि व्यवसायसंघाच्या [1][पदाधिकाऱ्यांना] व सदस्यांना हिशेबपुस्तकांचे निरीक्षण करण्यासाठी द्यावयाच्या पर्याप्त सुविधा; आणि

(ञ) व्यवसायसंघ कोणत्या रीतीने विसर्जित करता येईल.

आणखी तपशील मागवण्याची व नावांमध्ये फेरबदल करावयास सांगण्याची शक्ती.

७. (१) कोणताही अर्ज कलम ५ च्या उपबंधानुसार आहे किंवा कसे, अथवा तो व्यवसायसंघ कलम ६ खाली नोंदणी करून घेण्यास हक्कदार आहे किंवा कसे यांबाबत स्वतःची खात्री करून घेण्यासाठी निबंधकाला आणखी माहिती मागवता येईल, आणि अशी माहिती पुरवली जाईपर्यंत त्या व्यवसायसंघाची नोंदणी करण्याचे नाकारता येईल.

(२) ज्या नावाखाली व्यवसायसंघाची नोंदणी करण्याचे प्रस्तावित केलेले आहे ते नाव, ज्या नावाने अन्य कोणत्याही विद्यमान व्यवसायसंघ नोंदलेला आहे त्या नावाशी तंतोतंत जुळणारे असेल, अथवा निबंधकाच्या मते, ज्यायोगे जनतेची किंवा दोहोंपैकी कोणत्याही व्यवसायसंघाच्या सदस्यांची फसगत होण्याचा संभव आहे इतके त्या नावाशी मिळतेजुळते असेल तर, निबंधक नोंदणीसाठी अर्ज करणाऱ्या व्यक्तींना अर्जात नमूद केलेल्या व्यवसायसंघाचे नाव बदलण्यास सांगेल, आणि असा फेरबदल करण्यात येईपर्यंत संघाची नोंदणी करण्यास नकार देईल.

नोंदणी.

८. व्यवसायसंघाने नोंदणीबाबत या अधिनियमाखालील सर्व आवश्यकता पुऱ्या केल्या आहेत अशी खात्री झाल्यावर निबंधक, विहित करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये ठेवावयाच्या नोंदवहीत, नोंदणीसाठी केलेल्या अर्जासोबतच्या विवरणपत्रामध्ये अंतर्भूत असलेला व्यवसायसंघाबाबतचा तपशील नोंदवून त्या व्यवसायसंघाची नोंदणी करील.

नोंदणी प्रमाणपत्र.

९. कलम ८ खाली व्यवसायसंघाची नोंदणी केल्यावर निबंधक, विहित नमुन्यामध्ये नोंदणी प्रमाणपत्र देईल, व ते प्रमाणपत्र व्यवसायसंघाची या अधिनियमाखाली रीतसर नोंदणी झालेली आहे याचा निर्णायक पुरावा असेल.

---

१. १९६४ चा अधिनियम ३८, कलम २ द्वारे 'अधिकारी' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला (१ एप्रिल, १९६५ रोजी व तेव्हापासून).

२. १९६० चा अधिनियम ४२, कलम ६ द्वारे जादा.

**नोंदणी रद्द करणे.** १०. एखाद्या व्यवसायसंघाचे नोंदणी प्रमाणपत्र हे—

(क) व्यवसायसंघाने केलेला अर्ज विहित करण्यात येईल अशा रीतीने सत्यापित केल्यावर त्या अर्जावरून; किंवा

(ख) ते प्रमाणपत्र कपटाने किंवा चुकीने मिळवलेले होते, अथवा व्यवसायसंघाचे अस्तित्व संपुष्टात आले आहे. अथवा त्याने बुद्धिपुरःसर आणि निबंधकांकडून नोटीस मिळाल्यावरही या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधांचे व्यतिक्रमण केलेले आहे किंवा अशा कोणत्याही उपबंधाशी विसंगत असा कोणताही नियम अंमलात राहू दिला आहे, अथवा ज्या बाबींसाठी उपबंध करणे कलम ६ द्वारे आवश्यक केलेले आहे अशा कोणत्याही बाबींसाठी उपबंध करणारा नियम विखंडित केलेला आहे अशी जर निबंधकाची खात्री पटली तर, निबंधकाला तो मागे घेता येईल किंवा रद्द करता येईल :

परंतु, व्यवसायसंघाच्या अर्जावरून नव्हे तर अन्यथा प्रमाणपत्र मागे घेण्यापूर्वी किंवा रद्द करण्यापूर्वी निबंधक ते प्रमाणपत्र मागे घेण्याचे किंवा रद्द करण्याचे कोणत्या कारणावरून प्रस्तावित केलेले आहे ते विनिर्दिष्ट करणारी किमान दोन महिन्यांची आगाऊ लेखी नोटीस त्या व्यवसायसंघाला देईल.

**अपील.** [१][११. (१) व्यवसायसंघाची नोंदणी करण्यास निबंधकाने दिलेल्या कोणत्याही नकारामुळे किंवा नोंदणी प्रमाणपत्र मागे घेतल्यामुळे किंवा रद्द केल्यामुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, विहित असेल त्या कालावधीमध्ये—

(क) जेव्हा व्यवसायसंघाचे मुख्य कार्यालय इलाखा शहराच्या [२]* * * सीमांमध्ये असेल तेव्हा, उच्च न्यायालयाकडे, किंवा

(ख) जेव्हा ते मुख्य कार्यालय अन्य कोणत्याही क्षेत्रामध्ये असेल तेव्हा, मूळ अधिकारिता असलेल्या प्रधान दिवाणी न्यायालयाच्या अतिरिक्त किंवा सहायक न्यायाधीशाच्या न्यायालयाहून कनिष्ठ नसलेले असे जे न्यायालय [३][समुचित शासन] त्या क्षेत्रासाठी या बाबतीत नियत करील त्या न्यायालयाकडे अपील करता येईल.

(२) अपील न्यायालय अपील खारीज करू शकेल अथवा निबंधकाला संघाची नोंदणी करण्याचे व कलम ९ च्या उपबंधाखाली नोंदणी प्रमाणपत्र देण्याचे निर्देशित करणारा अगर प्रमाणपत्र मागे घेण्याबद्दलचा किंवा, प्रकरणपरत्वे, रद्द करण्याबद्दलचा आदेश रद्द ठरवणारा आदेश काढू शकेल, आणि निबंधक अशा आदेशाचे पालन करील.

(३) पोटकलम (१) खालील अपिलाच्या प्रयोजनार्थ अपील न्यायालय, होईल तेथवर, 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याखाली दाव्याची संपरीक्षा करताना ते जी कार्यपद्धती अनुसरते तीच कार्यपद्धती अनुसरील आणि तेव्हा त्याला ज्या शक्ती असतात त्याच शक्ती त्याला असतील आणि अपिलाचा संपूर्ण खर्च किंवा त्याचा कोणताही भाग कोणी द्यावा हे ते निदेशित करू शकेल आणि असा खर्च जणू काही तो उक्त संहितेखालील दाव्यामध्ये निवाड्याने देववलेला असावा त्याप्रमाणे वसूल केला जाईल.

(४) पोटकलम (१) खंड (ख) खाली नियत केलेल्या कोणत्याही न्यायालयान अपील खारीज केल्यास नाराज झालेल्या व्यक्तीला उच्च न्यायालयाकडे अपील करण्याचा अधिकार असेल, आणि उच्च न्यायालयाला अशा अपिलाच्या प्रयोजनार्थ, पोटकलमे (२) व (३) याखाली अपील न्यायालयाला असणाऱ्या सर्व शक्ती असतील आणि त्या पोटकलमाचे उपबंध तदनुसार लागू होतील.]

**नोंदलेले कार्यालय.** १२. नोंदलेल्या व्यवसायसंघाला पाठवावयाचे सर्व संदेश व नोटिसा त्याच्या नोंदलेल्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवता येतील. मुख्य कार्यालयाच्या पत्त्यामध्ये कोणताही फेरबदल झाल्यास असा फेरबदल झाल्यापासून चौदा दिवसांच्या आत निबंधकाला त्याबद्दलची लेखी नोटीस द्यावी लागेल आणि त्या बदललेल्या पत्त्याची कलम ८ मध्ये निर्देशिलेल्या नोंदवहीमध्ये नोंद घेतली जाईल.

**नोंदलेल्या व्यवसायसंघाचे निगमन.** १३. प्रत्येक नोंदलेला व्यवसायसंघ हा ज्या नावाखाली त्याची नोंदणी झालेली आहे त्या नावाचा एक निगमनिकाय असेल, आणि त्याला उत्तराधिकाराची निरंतर परंपरा व सामाईक मोहोर असेल, तसेच जंगम व स्थावर अशा दोन्ही प्रकारची संपत्ती संपादन करून धारण करण्याची व संविदा करण्याची शक्ती असेल, आणि उक्त नावाने त्याला व त्याच्या विरुद्ध दावा लावता येईल.

**विवक्षित अधिनियम नोंदलेल्या व्यवसायसंघांना लागू व्हावयाचे नाहीत.** १४. पुढील अधिनियम कोणत्याही नोंदलेल्या व्यवसायसंघाला लागू होणार नाहीत, आणि अशा कोणत्याही व्यवसायसंघाची अशा कोणत्याही अधिनियमाखालील नोंदणी शून्य असेल, ते अधिनियम असे—

(क) 'संस्था नोंदणी अधिनियम, १८६०' (१८६० चा २१),

(ख) 'सहकारी संस्था अधिनियम, १९१२' (१९१२ चा २),

[४][(ग) 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १)].

---

१. १९२८ चा अधिनियम १५, कलम २ द्वारे मूळ कलमाऐवजी घातले.

२. 'भारत शासन (भारतीय कायद्यांचे अनुकूलन) आदेश, १९३७' द्वारे "किंवा रंगूनच्या" हे शब्द गाळले.

३. वरील आदेशाद्वारे "स्थानिक शासन" याऐवजी घातले.

४. १९६० चा अधिनियम ४२, कलम ७ द्वारे मूळ खंड (ङ) ऐवजी घातले व त्याला खंड (ग) असा नवीन क्रमांक दिला. १९४२ चा अधिनियम २५, कलम २ व अनुसूची एक याद्वारे मूळ खंड (ग) व (घ) निरसित केले होते.

## प्रकरण ३ रे

### नोंदलेल्या व्यवसायसंघांचे अधिकार व दायित्वे

१५. नोंदलेल्या व्यवसायसंघाचा सर्वसाधारण निधी खालील उद्दिष्टांव्यतिरिक्त अन्य कशावरही खर्च करता येणार नाही, ती उद्दिष्टे अशी :— ज्या उद्दिष्टांवर सर्वसाधारण निधी खर्च करता येईल ती उद्दिष्टे.

(क) व्यवसायसंघाच्या [1][पदाधिकाऱ्यांना] वेतने, भत्ते व खर्च देणे ;

(ख) व्यवसायसंघाच्या प्रशासनाबद्दलचा खर्च देणे—यामध्ये व्यवसायसंघाच्या सर्वसाधारण निधीच्या हिशेबांच्या लेखापरीक्षेचाही समावेश आहे ;

(ग) ज्या कोणत्याही वैध कार्यवाहीमध्ये व्यवसायसंघ किंवा त्याचा कोणताही सदस्य हा पक्षकार असेल तीमध्ये व्यवसायसंघ म्हणून त्याचे कोणतेही अधिकार अथवा कोणत्याही सदस्याचे त्याचा नियोक्ता किंवा त्या सदस्याने कामावर ठेवलेली व्यक्ती यांच्याशी जे संबंध असतील त्यामधून उद्‌भवणारे कोणतेही अधिकार संपादन करण्याच्या किंवा त्यांचे संरक्षण करण्याच्या प्रयोजनार्थ जेव्हा फिर्याद चालवण्याचे किंवा बचाव देण्याचे काम अंगीकारलेले असेल तेव्हा, अशी फिर्याद चालवणे किंवा त्यात बचाव देणे ;

(घ) व्यवसायसंघ किंवा त्याचा कोणताही सदस्य यांच्यावतीने व्यावसायिक तंटे चालवणे ;

(ङ) व्यावसायिक तंट्यामधून उद्‌भवणाऱ्या हानीबद्दल सदस्यांना भरपाई देणे ;

(च) सदस्यांचा मृत्यू, वयोवृद्धत्व, आजारपण, अपघात किंवा बेकारी यास्तव अशा सदस्यांना किंवा त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींना भत्ते देणे ;

(छ) सदस्यांच्या आयुष्याचा विमा उतरवणारी विमापत्रे अथवा आजारपण, अपघात किंवा बेकारी याबद्दल सदस्यांचा विमा उतरविणारी विमापत्र देणे किंवा त्याखालील दायित्व अंगीकारणे ;

(ज) सदस्यांसाठी किंवा त्या सदस्यांवर अवलंबून असलेल्या व्यक्तींसाठी शैक्षणिक, सामाजिक किंवा धार्मिक लाभांची तरतूद करणे (यामध्ये मृत सदस्यांचे अंत्यसंस्कार किंवा धार्मिक क्रिया यांचा खर्च देणे समाविष्ट आहे );

(झ) नियोक्ते किंवा कामगार म्हणून त्यांच्याशी संबंधित असणाऱ्या प्रश्नांवर मुख्यत्वेकरून चर्चा करण्यासाठी प्रकाशित होणारे नियतकालिक चालवणे ;

(ञ) व्यवसायसंघाचा सर्वसाधारण निधी ज्यावर खर्च करता येईल अशांपैकी कोणत्याही उद्दिष्टांच्या पुर:सरणार्थ, सर्वसाधारणपणे कामगारांच्या फायद्यासाठी योजलेल्या कोणत्याही प्रयोजनास्तव अंशदाने देणे—मात्र कोणत्याही वित्तीय वर्षातील अशा अंशदानाबाबतचा खर्च हा त्या वर्षातील कोणत्याही वेळी, त्या वर्षामध्ये त्या वेळेपर्यंत व्यवसायसंघाच्या सर्वसाधारण निधीमध्ये जेवढे ठोक उत्पन्न उपार्जित झाले असेल तेवढे उत्पन्न आणि त्या वर्षाच्या प्रारंभी त्या निधीच्या जमाखाती शिल्लक असेल तेवढी रक्कम मिळून होणाऱ्या एकूण रकमेच्या एक-चतुर्थांशाहून अधिक असणार नाही ; आणि

(ट) [2][समुचित शासनाने] शासकीय राजपत्रात अधिसूचित केलेले अन्य कोणतेही उद्दिष्ट—अधिसूचनेच्या अंतर्भूत असलेल्या कोणत्याही शर्तींच्या अधीनतेने.

१६. (१) नोंदलेल्या व्यवसायसंघाला पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणत्याही उद्दिष्टांच्या पुर:सरणार्थ व्यवसायसंघाच्या सदस्यांचे नागरी आणि राजकीय हितवर्धन करण्यासाठी ज्या निधीतून पैसे खर्च करता यतील असा एक स्वतंत्र निधी, त्यासाठी स्वतंत्रपण वसूल केलेल्या किंवा त्यापोटी दिलेल्या अंशदानामधून घटित करता येईल. राजकीय प्रयोजनार्थ एक स्वतंत्र निधी घटित करणे.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्देशित केलेली उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :—

(क) [3]* * * *[4][संविधानाच्या] अन्वये घटित केलेल्या कोणत्याही विधानमंडळाचा किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी उभ्या राहिलेल्या उमेदवाराला किंवा भावी उमेदवाराला निवडणुकीपूर्वी, निवडणुकीमध्ये किंवा निवडणुकीनंतर त्यांच्या उमेदवारीच्या किंवा निवडणुकीच्या संबंधात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे आलेला कोणताही खर्च देणे;

(ख) अशा कोणत्याही उमेदवाराला किंवा भावी उमेदवाराला पाठिंबा देण्यासाठी कोणतीही सभा भरवणे अथवा कोणतेही लिखित साहित्य किंवा कागदपत्र वाटणे ;

(ग) [3]* * * [4][संविधानाच्या] अन्वये घटित झालेल्या कोणत्याही विधानमंडळाचा किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचा सदस्य असणाऱ्या व्यक्तीचा चरितार्थ चालवणे ;

(घ) [3]* * * [4][संविधानाच्या] अन्वये घटित झालेल्या कोणत्याही विधानमंडळाकरता किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकरिता मतदारांची नोंदणी करणे किंवा उमेदवारांची निवड करणे ; किंवा

---

१. १९६४ चा अधिनियम ३८, कलम २ द्वारे 'अधिकारी' या ऐवजी हा शब्दोल्लेख घातला ( १ एप्रिल १९६५ रोजी व तेव्हापासून).

२. 'भारत शासन (भारतीय कायद्यांचे अनुकूलन) आदेश, १९३७' द्वारे 'गव्हर्नर-जनरल-इन-कौन्सिल या ऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

३. १९६० चा अधिनियम ४२, कलम ८ द्वारे "भारत शासन अधिनियम किंवा 'भारत शासन अधिनियम, १९३५' याच्या किंवा" हा मजकूर गाळला.

४. 'विधि अनुकूलन आदेश, १९५०' द्वारे घातले.

(ङ) कोणत्याही प्रकारच्या राजकीय सभा भरवणे किंवा कोणत्याही प्रकारचे राजकीय लिखित साहित्य किंवा राजकीय कागदपत्र वाटणे.

[1][(२क) संविधानाअन्वये घटित केलेल्या कोणत्याही विधानमंडळाबाबतचे पोट-कलम (२) मधील निर्देश जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना त्यामध्ये त्या राज्याच्या विधानमंडळाच्या निर्देशाचा समावेश आहे असा त्यांचा अर्थ लावला जाईल.]

(३) पोट-कलम (१) खाली घटित केलेल्या निधीमध्ये अंशदान करण्यासाठी कोणत्याही सदस्यावर सक्ती केली जाणार नाही ; आणि जो सदस्य उक्त निधीमध्ये अंशदान करणार नाही त्याला व्यवसाय-संघाच्या कोणत्याही लाभांपासून वंचित केले जाणार नाही अथवा उक्त निधीमध्ये तो अंशदान करीत नाही एवढ्याच कारणास्तव, (उक्त निधीचे नियंत्रण व व्यवस्थापन यांचा संबंध असेल तेवढे खेरीज-करून इतर बाबतीत) व्यवसायसंघाच्या अन्य सदस्यांच्या तुलनेने त्याच्यावर प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही प्रकारची नि:समर्थता लादली जाणार नाही किंवा त्याचा तोटा केला जाणार नाही; आणि व्यवसायसंघामध्ये प्रवेश मिळण्यासाठी उक्त निधीमध्ये अंशदान करण्याची शर्त ठेवली जाणार नाही.

**व्यावसायिक तंटयां-मध्ये फौजदारीपात्र कट.**

१७. कलम १५ मध्ये विनिर्दिष्ट केलेले असे व्यवसायसंघाचे जे कोणतेही उद्दिष्ट असेल त्याच्या पुर:सरणार्थ सदस्यांमध्ये झालेला कोणताही करार म्हणजे गुन्हा करण्याचा करार नसेल तर, नोंदलेल्या व्यवसायसंघाचा कोणताही [2][पदाधिकारी] किंवा सदस्य त्या कराराच्या संबंधात 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) कलम १२०ख–पोट-कलम (२) खाली शिक्षेस पात्र ठरणार नाही.

**विवक्षित प्रकरणी दिवाणी दाव्यांपासून उन्मुक्ती.**

१८. (१) ज्यामध्ये व्यवसायसंघाचा एखादा सदस्य पक्षकार असेल अशा एखाद्या व्यावसायिक तंटयाच्या पूर्वकल्पनेने किंवा त्याच्या पुर:सरणार्थ केलेली कोणतीही कृती, केवळ अन्य कोणत्याही व्यक्तीला नोकरीची संविदा मोडण्यास प्रवृत्त करते अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीचा व्यवसाय, धंदा किंवा नोकरी यांच्या अगर आपले भांडवल किंवा आपले श्रम यांचा आपल्या इच्छेनुरूप विनियोग करण्याबाबत अन्य कोणत्याही व्यक्तीला असलेल्या अधिकाराच्या आड येते एवढ्याच कारणावरून अशा कृतीबाबत कोणताही नोंदलेला व्यवसायसंघ किंवा त्याचा कोणताही [2][पदाधिकारी] किंवा सदस्य यांच्याविरुद्ध कोणत्याही दिवाणी न्यायालयात कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही चालवता येणार नाही.

(२) एखाद्या व्यावसायिक तंटयाच्या पूर्वकल्पनेने किंवा त्याच्या पुर:सरणार्थ व्यवसायसंघाच्या अभिकर्त्याने केलेली कोणतीही अपकृती अशा व्यक्तीने व्यवसायसंघाच्या कार्यकारिणीच्या नकळत किंवा तिने दिलेल्या अनुदेशांच्या विरुद्ध जाऊन केली होती असे शाबित करण्यात आले तर, नोंदलेला व्यवसाय-संघ अशा अपकृतीबद्दल कोणत्याही दिवाणी न्यायालयात कोणत्याही दाव्यामध्ये किंवा अन्य वैध कार्य-वाहीमध्ये दायी ठरणार नाही.

**करारांची बजावणी-योग्यता.**

१९. त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नोंदलेल्या व्यवसायसंघाच्या सदस्यांमधील एखादा करार हा केवळ त्या करारामधील उद्दिष्टांपैकी कोणतेही उद्दिष्ट व्यवसायविरोधी आहे एवढ्याच वस्तुस्थितीमुळे शून्य ठरणार नाही किंवा शून्यकरणीय ठरणार नाही :

परंतु, आपल्या मालाची विक्री करणे, धंदा चालवणे, कामकाज चालवणे, कामाला लावणे किंवा कामाला राहणे या गोष्टी ज्या शर्तींअन्वये व्यवसायसंघाच्या कोणत्याही सदस्यांना करणे किंवा न करणे भाग पडेल त्या शर्तींच्या संबंधातील कोणत्याही कराराच्या भंगाबद्दल नुकसानी द्यावयास लावण्याच्या किंवा वसूल करण्याच्या व्यक्त प्रयोजनार्थ मांडलेली कोणतीही वैध कार्यवाही विचारार्थ स्वीकारणे या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे दिवाणी न्यायालयाला शक्य होणार नाही.

**व्यवसायसंघाच्या हिशेबपुस्तकांचे निरीक्षण करण्याचा अधिकार.**

२०. नोंदलेल्या व्यवसायसंघाची हिशेबपुस्तके आणि त्याच्या सदस्यांची सूची व्यवसायसंघाच्या नियमांमध्ये उपबंधित करण्यात येईल अशा वेळी व्यवसायसंघाचा [2][पदाधिकारी] किंवा सदस्य यांना निरीक्षणार्थ खुली असतील.

**अज्ञान व्यक्तींना व्यवसायसंघाच्या सदस्यत्वाबाबतचे अधिकार.**

२१. पंधरा वर्षांचे वय झालेल्या कोणत्याही व्यक्तीला एखाद्या नोंदलेल्या व्यवसायसंघाचा सदस्य होता येईल—मात्र त्या व्यवसायसंघाचे नियम त्याविरोधी असले तर गोष्ट अलाहिदा —आणि पूर्वोक्ताप्रमाणे त्या नियमांच्या अधीनतेने, तिला सदस्य म्हणून सर्व अधिकार उपभोगता येतील आणि या नियमांखाली संलेख निष्पादित करणे किंवा निस्तारणपत्रे देणे आवश्यक असल्यास ते सर्व संलेख निष्पादित करता येतील किंवा ती सर्व निस्तारणपत्रे देता येतील.

[3] * * * * *

**[4][व्यवसायसंघाच्या पदाधिकाऱ्यांच्या निरर्हता.]**

[4][२१क. (१) जर एखादी व्यक्ती—

(एक) अठरा वर्षे वयाची झालेली नसेल तर ;

(दोन) नैतिक अध:पतन अनुस्यूत असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल भारतातील न्यायालयाने दोषी ठरवलेली असून तिला कारावासाची शिक्षा झालेली असेल व तिची मुक्तता झाल्यापासून पाच वर्षांचा कालावधी लोटलेला नसेल तर,

---

१. १९७० चा अधिनियम ५१, कलम २ व अनुसूची यांद्वारे घातले.

२. १९६४ चा अधिनियम ३८, कलम २ द्वारे 'अधिकारी' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला. (१ एप्रिल १९६५ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे परंतुक गाळले (१ एप्रिल १९६५ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे घातले (१ एप्रिल १९६५ रोजी व तेव्हापासून).

ती नोंदलेल्या व्यवसायसंघाच्या कार्यकारिणीचा सदस्य म्हणून किंवा त्याचा अन्य कोणताही पदाधिकारी म्हणून निवडली जाण्यास किंवा त्या पदावर राहण्यास निरर्ह ठरेल.

(२) नोंदलेल्या व्यवसायसंघाच्या कार्यकारिणीचा जो कोणताही सदस्य किंवा त्याचा अन्य पदाधिकारी नैतिक अधःपतन अनुस्यूत असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल 'भारतीय व्यवसायसंघ (विशोधन) अधिनियम, १९६४' यांच्या प्रारंभापूर्वी दोषी ठरलेला असून ज्याला कारावासाची शिक्षा झालेली असेल तो, त्याच्या मुक्ततेनंतर अशा प्रारंभाच्या दिनांकापूर्वी मध्यंतरी पाच वर्षांचा कालावधी लोटलेला नसल्यास त्या प्रारंभ-दिनांकी असा सदस्य किंवा पदाधिकारी असण्याचे बंद होईल.]

[१][(३) पोटकलम (२) मधील 'भारतीय व्यवसायसंघ (विशोधन) अधिनियम, १९६४' याच्या प्रारंभाचा निर्देश जम्मू व काश्मीर राज्याला लागू करताना त्याचा अर्थ, उक्त राज्यामधील या अधिनियमाच्या प्रारंभाचा निर्देश म्हणून लावला जाईल.]

**उद्योगाशी संबंधित असावयाच्या अधिकाऱ्यांचे प्रमाण.**

२२. प्रत्येक नोंदलेल्या व्यवसायसंघाच्या [२][पदाधिकाऱ्यांच्या] एकूण संख्येपैकी किमान निम्मे पदाधिकारी म्हणजे ज्या उद्योगाशी व्यवसायसंघ संबंधित आहे त्यामध्ये प्रत्यक्षपणे कामाला असलेल्या किंवा तेथे नेमलेल्या व्यक्ती असतील :

परंतु, [३][समुचित शासनाला] विशेष किंवा सर्वसाधारण आदेशाद्वारे असे घोषित करता येईल की; त्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या व्यवसायसंघाला किंवा एखाद्या वर्गाच्या व्यवसायसंघांना या कलमाचे उपबंध लागू होणार नाहीत.

**नावातील बदल.**

२३. कोणत्याही नोंदलेल्या व्यवसायसंघाला, त्यांच्या एकूण सदस्य-संख्येच्या दोन-तृतीयांश इतक्या सदस्यांच्या संमतीने आणि कलम २५ च्या उपबंधांच्या अधीनतेने आपले नाव बदलता येईल.

**व्यवसायसंघांचे संमीलन.**

२४. कोणत्याही दोन किंवा अधिक नोंदलेल्या व्यवसायसंघांना, अशा व्यवसायसंघांचे विसर्जन करून किंवा न करता अथवा त्यांच्या निधींचे विभाजन करून किंवा न करता अथवा यांपैकी दोन्ही प्रकारे किंवा कोणत्याही प्रकारे एक व्यवसायसंघ म्हणून संमीलित होता येईल ; परंतु, अशा एकूण एक व्यवसायसंघांच्या मतदानास हक्कदार असलेल्या किमान निम्म्या सदस्यांनी तरी आपले मत नोंदवलेले असले पाहिजे आणि नोंदवण्यात आलेल्यांपैकी किमान साठ टक्के मते त्या प्रस्तावास अनुकूल असली पाहिजेत.

**नाव बदलण्याची किंवा संमीलनाची नोटीस.**

२५. (१) नावातील प्रत्येक बदल आणि प्रत्येक संमीलन याची लेखी नोटीस, नावातील बदलाच्याबाबतीत आपले नाव बदलणाऱ्या व्यवसायसंघाचा सचिव व सात सदस्य यांच्या आणि संमीलनाच्याबाबतीत त्यात सहभागी झालेल्या एकूण एक व्यवसायसंघांचे सचिव व त्यांचे सात सदस्य यांच्या स्वाक्षरीनिशी निबंधकाकडे पाठवावी लागेल आणि संमीलित व्यवसायसंघाचे मुख्य कार्यालय वेगळ्या राज्यात असेल तर अशा राज्याच्या निबंधकाकडे पाठवावी लागेल.

(२) जर प्रस्तावित नाव हे, ज्या नावाने अन्य कोणत्याही विद्यमान व्यवसायसंघाची नोंदणी केलेली आहे त्या नावाशी तंतोतंत जुळणारे असेल किंवा, निबंधकाच्या मते, ज्यायोगे जनतेची किंवा दोहोंपैकी कोणत्याही व्यवसायसंघाच्या सदस्यांची फसगत होण्याचा संभव आहे इतके त्या नावाशी मिळतेजुळते असेल तर, निबंधक त्या नावातील बदलाची नोंदणी करण्यास नकार देईल.

(३) पोटकलम (२) मध्ये उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, जर नाव बदलण्याबाबत या अधिनियमात असलेल्या उपबंधांचे अनुपालन झालेले आहे अशी निबंधकाची खात्री पटली तर, तो कलम ८ मध्ये निर्देशित केलेल्या नोंदवहीमध्ये नावातील बदलाची नोंद करील आणि हा नावातील बदल अशा नोंदणीच्या दिनांकापासून अंमलात येईल.

(४) संमीलित व्यवसायसंघाचे मुख्य कार्यालय ज्या राज्यात असेल त्या राज्याच्या निबंधकाची जर अशी खात्री पटली की, संमेलनाबाबत या अधिनियमात असलेल्या उपबंधांचे अनुपालन झालेले आहे. आणि त्यातून बनलेला व्यवसायसंघ कलम ६ खाली नोंदणी होण्यास हक्कदार आहे, तर तो कलम ८ मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने त्या व्यवसायसंघाची नोंदणी करील आणि हे संमीलन अशा नोंदणीच्या दिनांकापासून अंमलात येईल.

**नावातील बदल व संमीलन यांचे परिणाम.**

२६. (१) नोंदलेल्या व्यवसायसंघाच्या नावातील बदलामुळे त्या व्यवसायसंघाचे कोणतेही अधिकार किंवा आबंधने यांच्यावर परिणाम होणार नाही आणि त्या व्यवसायसंघाने किंवा त्याच्याविरुद्ध केलेली कोणतीही वैध कारवाई त्यामुळे सदोष ठरणार नाही, आणि त्याच्या पूर्वीच्या नावाने त्याला किंवा त्याच्याविरुद्ध जी वैध कार्यवाही चालू ठेवता आली असती किंवा सुरू करता आली असती ती त्याच्या नवीन नावाने त्याला किंवा त्याच्याविरुद्ध चालू ठेवता येईल किंवा सुरू करता येईल.

---

१. १९७० चा अधिनियम ५१, कलम २ व अनुसूची यांद्वारे घातले.

२. १९६४ चा अधिनियम ३८, कलम २ द्वारे 'अधिकारी' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला (१ एप्रिल, १९६५ रोजी व तेव्हापासून).

३. 'भारत शासन (भारतीय कायद्यांचे अनुकूलन) आदेश, १९३७' द्वारे 'स्थानिक शासन' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

(२) दोन किंवा अधिक नोंदलेल्या व्यवसायसंघांचे संमीलन झाल्यामुळे अशा व्यवसायसंघांपैकी कोणाच्याही कोणत्याही अधिकारास किंवा त्यांच्यापैकी कोणाच्याही धनकोच्या कोणत्याही अधिकारास बाध येणार नाही.

विसर्जन. २७. (१) जेव्हा एखादा नोंदलेला व्यवसायसंघ विसर्जित केला जाईल तेव्हा, त्या व्यवसायसंघाचे सात सदस्य आणि सचिव यांनी स्वाक्षरित केलेली विसर्जनाची नोटीस अशा विसर्जनापासून चौदा दिवसांच्या आत निबंधकाकडे पाठवावी लागेल, आणि ते विसर्जन त्या व्यवसायसंघाच्या नियमांनुसार झालेले आहे अशी निबंधकाची खात्री पटली तर तो तिची नोंदणी करील आणि ते विसर्जन अशा नोंदणीच्या दिनांकापासून अंमलात येईल.

(२) जेव्हा नोंदलेला व्यवसायसंघ विसर्जित झाल्याची नोटीस नोंदलेली असेल आणि त्या व्यवसायसंघाच्या नियमांमध्ये, विसर्जनानंतर व्यवसायसंघाच्या निधीचे वितरण करण्याबाबतचा उपबंध केलेला नसेल तेव्हा, निबंधक, विहित करण्यात येईल अशा रीतीने त्याच्या सदस्यांमध्ये निधी विभागून देईल.

प्रतिवेदने. २८. (१) दरवर्षी, विहित करण्यात येईल अशा दिनांकास किंवा त्यापूर्वी प्रत्येक नोंदलेल्या व्यवसायसंघाची अशा विहित दिनांकाच्या लगतपूर्वीच्या ३१ [१][डिसेंबर] रोजी संपणाऱ्या वर्षामधील सर्व जमा आणि खर्च यांचे आणि अशा ३१ [१][डिसेंबर] रोजी अस्तित्वात असलेली व्यवसायसंघाची मत्ता आणि दायित्वे यांचे विहित रीतीने लेखापरीक्षा केलेले असे एक सर्वसाधारण विवरणपत्र निबंधकाकडे पाठवावे लागेल.

(२) अशा सर्वसाधारण विवरणपत्रासोबत ते सर्वसाधारण विवरणपत्र ज्या वर्षाच्या संदर्भात असेल त्या वर्षात व्यवसायसंघाने [२][पदाधिकाऱ्यासंबंधी] केलेले सर्व बदल दर्शवणारे असे एक निवेदन व त्याशिवाय हे सर्व पाठवण्याच्या दिनांकापर्यंत अद्यावत् अशी त्या व्यवसायसंघाच्या नियमावलीची प्रतसुद्धा निबंधकाकडे पाठवावी लागेल.

(३) नोंदलेल्या व्यवसायसंघाच्या नियमावलीमध्ये केलेल्या प्रत्येक फेरबदलाची प्रत असा फेरबदल केल्यापासून पंधरा दिवसांच्या आत निबंधकाकडे पाठवावी लागेल.

[३][(४) पोटकलमे (१), (२) आणि (३) यांमध्ये निर्देशित केलेल्या दस्तऐवजांची तपासणी करण्याच्या प्रयोजनार्थ, निबंधक अथवा त्याने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी सर्व वाजवी वेळी व्यवसायसंघाच्या नोंदलेल्या कार्यालयामध्ये त्या व्यवसायसंघाच्या संबंधातील नोंदणी प्रमाणपत्र, हिशेबपुस्तके, नोंदवह्या व अन्य दस्तऐवज यांचे निरीक्षण करू शकेल अथवा तो याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा जागी ती सादर करण्यास फर्मावू शकेल,—मात्र अशी कोणतीही जागा व्यवसायसंघाच्या नोंदलेल्या कार्यालयापासून दहा मैलांपेक्षा जास्त अंतरावर असता कामा नये.]

## प्रकरण ४ थे

### विनियम

विनियम करण्याची शक्ती. २९. (१) [४]* * * [५][समुचित शासनाला] या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनार्थ विनियम करता येतील.

(२) विशेष आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा विनियमांमध्ये पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबतीत उपबंध करता येतील, त्या बाबी अशा :—

(क) व्यवसायसंघ व व्यवसायसंघाची नियमावली यांची कोणत्या रीतीने नोंदणी करता येईल व नोंदणीच्या वेळी द्यावयाची फी ;

(ख) ज्या कोणत्याही नोंदलेल्या व्यवसायसंघाने आपले मुख्य कार्यालय एका राज्यातून दुसऱ्या राज्यात हलवले असेल त्याची नोंदणी वर्ग करणे ;

(ग) नोंदलेल्या व्यवसायसंघाच्या किंवा कोणत्याही वर्गातील अशा संघांच्या हिशेबांची लेखापरीक्षा कोणत्या रीतीने व कोणत्या अर्हता असणाऱ्या व्यक्तींनी करावयाची ;

(घ) निबंधकांनी ठेवलेल्या दस्तऐवजांचे निरीक्षण करण्यास कोणत्या शर्तींच्या अधीनतेने अनुमती देण्यात येईल आणि अशा निरीक्षणाच्या बाबतीत किती फी आकारण्यात येईल ; आणि

(ङ) विहित करावयाची किंवा करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

---

१. १९६४ चा अधिनियम ३८, कलम ६ द्वारे "मार्च" याऐवजी घातले (१ एप्रिल, १९६५ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या—कलम २ द्वारे 'अधिकारी' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला (१ एप्रिल, १९६५ रोजी व तेव्हापासून).

३. १९६० चा अधिनियम ४२, कलम ९ द्वारे घातले.

४. 'भारत शासन (भारतीय कायद्यांचे अनुकूलन) आदेश, १९३७' द्वारे "गव्हर्नर-जनरल-इन-कौन्सिल यांच्या नियंत्रणाच्या अधीनतेने" हे शब्द गाळले.

५. वरील आदेशाच्या—द्वारे 'स्थानिक शासन' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

३०. (१) कलम ३१ द्वारे प्रदान केलेली विनियम करण्याची शक्ती ते विनियम पूर्वप्रकाशना- नंतर केले पाहिजेत या शर्तीला अधीन असेल. **विनियमांचे प्रकाशन.**

(२) जे विनियम करण्याचे प्रस्तावित केलेले आहे त्यांचा मसुदा ज्या दिनांकानंतर विचारात घेतला जाणार तो दिनांक म्हणून 'सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७' (१८९७ चा १०)—कलम २३ खंड (३) याच्या अनुसार विनिर्दिष्ट करावयाचा दिनांक हा, प्रस्तावित विनियमांचा मसुदा सार्वत्रिक माहितीकरिता जेव्हा प्रकाशित करण्यात आला असेल त्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आतला असणार नाही.

(३) याप्रमाणे केलेले विनियम **शासकीय राजपत्रात** प्रकाशित केले जातील, आणि अशा प्रकाशना-नंतर ते जणू काही या अधिनियमात अधिनियमित केलेले असावेत त्याप्रमाणे परिणामक होतील.

## प्रकरण ५ वे

### शास्ती व प्रक्रिया

३१. (१) या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाद्वारे किंवा त्याखाली आवश्यक केलेली कोणतीही नोटीस देणे किंवा कोणतेही विवरण किंवा अन्य दस्तऐवज पाठवणे यात कोणत्याही नोंदलेल्या व्यवसाय-संघाने कसूर केल्यास ती देण्यास किंवा ते पाठविण्यास व्यवसायसंघाच्या नियमाद्वारे बांधलेला प्रत्येक [1][पदाधिकारी] किंवा अन्य व्यक्ती, अथवा, असा कोणताही अधिकारी किंवा व्यक्ती नसल्यास व्यवसाय-संघाच्या कार्यकारणीचा प्रत्येक सदस्य हा, पाच रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास आणि कसूर चालू राहिल्यास त्याबाबतीत, पहिल्या आठवड्यानंतर कसूर चालू राहील अशा प्रत्येक आठवड्यागणिक पाच रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या जादा द्रव्यदंडास पात्र असेल : **प्रतिवेदने सादर करण्यात कसूर.**

परंतु, एकूण द्रव्यदंड पन्नास रुपयांपेक्षा अधिक असणार नाही.

(२) कलम २८ खाली आवश्यक असलेल्या सर्वसाधारण विवरणपत्रामध्ये अथवा त्या कलमाखाली निबंधकांकडे पाठवावयाच्या नियमावलीच्या किंवा नियमांतील फेरबदलांच्या कोणत्याही प्रतीमध्ये जी कोणतीही व्यक्ती बुद्धिपुरःसर कोणतीही खोटी नोंद करील किंवा करवील अथवा त्यातून काहीही गाळून टाकील किंवा तसे करवील ती, पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

३२. व्यवसायसंघाच्या कोणत्याही सदस्याला किंवा अशा व्यवसायसंघाचा सदस्य होऊ इच्छिणाऱ्या किंवा त्यासाठी अर्ज करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, जी कोणतीही व्यक्ती फसवणूक करण्याच्या उद्देशाने जो दस्तऐवज व्यवसायसंघाच्या त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या नियमावलीची किंवा त्यातील फेर-बदलांची यथातथ्य प्रत नाही हे तिला माहित आहे किंवा तसे समजण्यास तिला कारण आहे असा कोणताही दस्तऐवज हा अशा नियमांची किंवा त्यातील फेरबदलांची प्रत म्हणून देईल अथवा जी कोणतीही व्यक्ती तशाच उद्देशाने एखाद्या नोंदणी न झालेल्या व्यवसायसंघाच्या कोणत्याही नियमावलीची प्रत असे नियम एखाद्या नोंदविलेल्या व्यवसायसंघाचे आहेत असा बहाणा करून कोणत्याही व्यक्तीला देईल ती, दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल. **व्यवसायसंघासंबंधी खोटी माहिती पुरविणे.**

३३. (१) इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी यांच्या न्यायालयाहून कनिष्ठ दर्जाचे कोणतेही न्यायालय या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करणार नाही. **अपराधांची दखल घेणे.**

(२) या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाबद्दल निबंधकाने किंवा त्याच्या पूर्वमंजुरीने दुसऱ्या कोणीतरी अथवा कलम १२ खालील अपराधाच्या बाबतीत ज्या व्यक्तीला प्रत दिलेली असेल तिने ज्या दिनांकास अपराध घडल्याचे अभिकथित करण्यात आले असेल त्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत तक्रार केल्याखेरीज, कोणतेही न्यायालय त्या अपराधाची दखल घेणार नाही.

---

१. १९६४ चा अधिनियम ३८, कलम २ द्वारे 'अधिकारी' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला. (१ एप्रिल १९६५ रोजी व तेव्हापासून)

# व्यवसाय संघ अधिनियम, १९२६–महाराष्ट्र विशोधन अधिनियम

## १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२[१]

[भारतीय व्यवसाय संघ (मुंबई विशोधन) अधिनियम, १९५६ ]

[७ जून १९५६]

'भारतीय व्यवसाय संघ अधिनियम, १९२६' हा मुंबई राज्यास लागू करताना त्यामध्ये आणखी, विशोधन करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, 'भारतीय व्यवसाय संघ अधिनियम, १९२६' (१९२६ चा १६) हा मुंबई राज्यास लागू करताना त्यामध्ये, यात यापुढे येणाऱ्या प्रयोजनांसाठी आणखी विशोधन करणे आवश्यक आहे; म्हणून भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमीत करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव. १. या अधिनियमास 'भारतीय व्यवसाय संघ (मुंबई विशोधन) अधिनियम, १९५६' असे म्हणता येईल.

१९२६ चा अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ३३ चे विशोधन. २. 'भारतीय व्यवसाय संघ अधिनियम, १९२६' (१९२६ चा १६) याचे कलम ३३–पोट-कलम (२) यामध्ये "सहा महिन्यांच्या आत" या मजकुरानंतर पुढीलप्रमाणे भर घालण्यात येईल,—

"आणि कलम ३१-पोट-कलम (२) खालील गुन्ह्याच्या बाबतीत, अभिकथित गुन्हा निबंधकाच्या निदर्शनास आल्याच्या लगतनंतरच्या सहा महिन्यांच्या आत".

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता पहा, **मुंबई सरकार राजपत्र**, १९५६, भाग ५ वा, पृष्ठ ६२.

## THE TRADE UNIONS ACT— 1926

## व्यवसाय संघ अधिनियम, १९२६

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| acquittances | निस्तारणपत्ने | [S. 21] |
| amalgamation | संमीलन | [S. 24-m.n.] |
| communications | संदेश | [S. 12] |
| conduct of trade disputes | व्यावसायिक तंटे चालवणे | [S. 15(d)] |
| correct copy | यथातथ्य प्रत | [S. 32] |
| criminal conspiracy | फौजदारीपात्र कट | [S. 17-m.n.] |
| enforceability | बजावणीयोग्यता | [S. 19-m.n.] |
| executive | कार्यकारिणी | [S. 2(a)] |
| general funds | सर्वसाधारण निधी | [S. 6(c)] |
| general statement | सर्वसाधारण विवरणपत्न | [S. 28(2)] |
| goodwill | ख्यातिस्व | [S 2(*h*)-prov (iii)] |
| identical | तंतोतंत जुळणारे | [S. 7(2)] |
| in contemplation of furtherance of | -च्यापूर्वकल्पनेने किंवा-च्यापुरस्सरणार्थ | [S. 18(1)] |
| induce | प्रवृत्त करणे | [S. 18(1)] |
| in restraint of trade | व्यवसायनिरोधी | [S. 19] |
| interference | आड येणे | [S. 18(1)] |
| literature or documents | लिखित साहित्य किंवा कागदपत्रे | [S. 16(2)(b)] |
| office-bearer | पदाधिकारी | [S. 2(b)] |
| old age | वयोवृद्धत्व | [S. 18(f)] |
| promotion of the civic and political interests | नागरी आणि राजकीय हितवर्धन | [S. 16(1))] |
| prospective candidate | भावी उमेदवार | [S. 16(2)(a)] |
| registered office | नोंदलेले कार्यालय | [S. 2(d)] |
| registered Trade Union | नोंदलेला व्यवसायसंघ | [S. 2(e)] |
| Registrar of Trade Unions | व्यवसायसंघ निबंधक | [S. 3(1)] |
| safe custody | सुरक्षित सांभाळ | [S. 6(i)] |
| statement | १. निवेदन | [S. 28(2)] |
| | २. विवरणपत्न | [S. 28(2)] |
| tortious act | अपकृति | [S. 18(2)] |
| trade dispute | व्यावसायिक विवाद/तंटा | [S. 2(g)] |
| Trade Union | व्यवसायसंघ | [S. 5(b)] |

# व्यवसायसंघ अधिनियम, १९२६

# THE TRADE UNIONS ACT, 1926

## मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अपकृति | tortious act | [क. १८(२)] |
| आड येणे | interference | [क. १८(१)] |
| कार्यकारिणी | executive | [क. २ (क्)] |
| ख्यातिस्व | goodwill | [क. २(ज्) परंतुक (तीन)] |
| —च्या पूर्वकल्पनेने किंवा—च्या पुरस्सरणार्थ | in contemplation or furtherance of | [क.१८(१)] |
| तंतोतंत जुळणारे | identical | [क. ७(२)] |
| नागरी आणि राजकीय हितवर्धन | promotion of the civic and political interests | [क. १६ (१)] |
| निवेदन | statement | [क. २८(२)] |
| निस्तारणपत्रे | acquittances | [क. २१] |
| नोंदलेला व्यवसायसंघ | registered Trade Union | [क. २(ड्)] |
| नोंदलेले कार्यालय | registered office | [क. २(घ्)] |
| पदाधिकारी | office-bearer | [क. २(ख्)] |
| प्रवृत्त करणे | induce | [क. १८(१)] |
| फौजदारी पात्र कट | criminal conspiracy | [क. १७-स.टी.)] |
| बजावणीयोग्यता | enforceability | [क. १९-स.टी.] |
| भावी उमेदवार | prospective candidate | [क. १६(२) (क्)] |
| यथातथ्य प्रत | correct copy | [क. ३२] |
| लिखित साहित्य किंवा कागदपत्रे | literature or documents | [क. १६(२) (ख्)] |
| वयोवृद्धत्व | old age | [क. १५(च्)] |
| विवरणपत्र | statement | [क. २८(२)] |
| व्यवसायनिरोधी | in restraint of trade | [क.१९] |
| व्यवसायसंघ | Trade Union | [क. २(ज्)] |
| व्यवसायसंघ निबंधक | Registrar of Trade Unions | [क. ३ (१)] |
| व्यावसायिक तंटे चालवणे | conduct of trade disputes | [क. १५ (घ्)] |
| व्यावसायिक विवाद/तंटा | trade dispute | [क. २(छ्)] |
| संदेश | communications | [क. १२] |
| संमीलन | amalgamation | [क. २४-स.टी.] |
| सर्वसाधारण निधी | general funds | [क. ६ (ग्)] |
| सर्वसाधारण विवरणपत्र | general statement | [क. २८ (२)] |
| सुरक्षित सांभाळ | safy custody | [क. ६ (झ्)] |

५८

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**

  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४.
  दूरध्वनी : ३६३ २६ ९३, ३६३ ०६ ९५
  ३६३ ११ ४८, ३६३ ४० ४९

- **व्यवस्थापक**

  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजिक,
  पुणे ४११ ००१
  दूरध्वनी : ६६ ८८ ५९

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४० ००१
  दूरध्वनी : ५२ २६ १५

- **सहा. संचालक**

  शासकीय लेखनसामग्री भांडार ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ
  औरंगाबाद ४३१ ००१
  दूरध्वनी : ३३ १४ ६८

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
  ताराबाई पार्क
  कोल्हापूर ४१६ ००३
  दूरध्वनी : ६५ ०३ ९५ व ६५ ०४ ०२

**महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**